पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. ७६ दिनांक १६/०९/२०२६

पालघर पोलीसांच्या तत्परतेने गणेश विसर्जनाच्या गर्दीत हरवलेल्या दोन चिमुकल्यांना दिले सुखरुप पालकांच्या ताब्यात

दिनांक १५/०९/२०२६ रोजी सायंकाळी १९.०० वाजताचे सुमारास केळवा बीच येथे दीड दिवसांच्या गणपतीचे विसर्जन सुरू असताना गणपती विसर्जना करीता समुद्रकिनारी मोठ्या प्रमाणात लोकांची गर्दी जमलेली होती. सदर वेळी केळवा पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असताना गर्दीमध्ये एक मुलगी व एक मुलगा, वय अंदाजे ४ ते ५ वर्ष असे हरवलेल्या स्थितीत मिळून आले. त्यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव सांगितले परंतु त्यांना त्यांच्या आई-वडिलांचे नाव व पत्ता सांगता येत नव्हते.

सदर मुलांच्या आई-वडिलांचा तसेच नातेवाईकांचा केळवा बिच परिसरात शोध घेतला असता तसेच आजूबाजूच्या ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ते मिळून आले नाहीत. त्यामुळे मिळून आलेल्या मुलांच्या फोटोच्या आधारे सोशल मीडियावर माहिती प्रसारित करुन तसेच प्रतिष्ठित नागरिक यांना माहिती दिली असता सदरची दोन्ही मुले ही गांधीनगर, पालघर, ता. जि. पालघर येथील असल्याचे निष्पन्न झाले. प्राप्त माहितीच्या आधारे केळवा पोलीस ठाणेचे पोलीस पथक यांनी सदर मुलांसह गांधीनगर, पालघर, ता. जि. पालघर येथे जाऊन मुलांचे पालक यांना समक्ष भेटून दोन्ही मुलांना सुखरूपरित्या त्यांचे ताब्यात देण्यात आले.

पालघर पोलीस दलाकडून आवाहन करण्यात येते की, गर्दीच्या ठिकाणी पालकांनी आपल्या लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. आपल्या मुलांना गर्दीत एकटे सोडू नका. आपल्या मुलांकडून आई-वडिलांचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक शक्य असल्यास पाठ करून घ्यावे. तसेच मुल हरविल्यास घाबरून न जाता तात्काळ जवळच्या पोलीस ठाणेस माहिती द्या.